# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.09.2024** **वार – मंगळवार**

---

**<u>पीएमआरडीए</u>**

पुणे परिसरातील विकास प्रक्रियेच्या नियोजनाची जबाबदारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची असून प्राधिकरणानं पुणे शहराची ओळख सांस्कृतिक शहर म्हणून कायम ठेवून शहराचा विकास करावा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेतखाली आज पुणे महानगर विकास प्राधिकरणाची बैठक पार पडली. या बैठकीत पीएमआरडीएच्या 3 हजार 838 कोटी 61 लाख रुपयांच्या अर्थसंकल्पाला मंजूरी देण्यात आली.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महानगरपालिकेतून फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावं वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे; मात्र तरीही या नगरपरिषदेची घडी बसवण्याची जबाबदारी राज्य सरकारनं पुणे महापालिकेवरच सोपवली आहे. नगरपरिषदेला पायाभूत सुविधा तसंच नागरी सेवा हस्तांतरीत करण्यासाठी समितीही स्थापन करण्यात आली आहे. फुरसुंगी आणि ऊरळी देवाची ही नवनिर्मित नगरपरिषद असल्यामुळे प्रशासकीय बाबी मंजूर होण्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. या कालावधीमध्ये नागरीकांच्या दैनंदिन मूलभूत सुविधामध्ये खंड पडू नये, यासाठी पुणे महानगरपालिकेकडून पूर्वी देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा हस्तांतरण पूर्ण होईपर्यंत कायम ठेवणं आवश्यक आहे. यासाठीचा शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे

**<u>अभ्यागतकक्ष</u>**

नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचं निवारण करण्यासाठी पुणे महापालिका आयुक्तांनी आयुक्त कार्यालयात अभ्यागत कक्ष निर्माण केला आहे. त्याच धर्तीवर आता क्षेत्रीय कार्यालय स्तरावरही अभ्यागत कक्ष निर्माण करण्यात येणार आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. सोमवारी आणि गुरुवारी दुपारी साडे तीन ते साडे पाच ही वेळ नागरिकांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी देण्यात आली आहे.

**<u>अभययोजना</u>**

थकीत वीजबिलांमुळे ज्या ग्राहकांचा वीज पुरवठा 31 मार्चपर्यंत खंडित झाला आहे अशा वीज ग्राहकांसाठी महावितरणने 1 सप्टेंबर ते 30 नोव्हेंबरपर्यंत अभय योजना लागू केली आहे. या योजनेत पश्चिम महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत सुमारे 5 हजार ग्राहकांनी सहभाग नोंदवला आहे. कृषी आणि सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित घरगुती, वाणिज्यक, औद्योगिक आणि इतर वीज ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकीत वीजबिलांमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या सर्व ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होऊन थकबाकीमुक्त व्हावं असं आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केलं आहे.

**<u>परिसंवाद</u>**

पुण्यातील संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्थेच्या तंत्रज्ञान व्यवस्थापन विभागाने गेल्या आठवड्यात ‘व्यवस्थापन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास’ ; या विषयावर एका परिसंवादाचं आयोजन केलं होतं. संरक्षण क्षेत्रात नवोन्मेशी संकल्पना राबवताना तांत्रिक-व्यवस्थापकीय कौशल्यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्याच्या उद्देशानं या परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. या परिसंवादात

संरक्षण विभागाच्या मिलिट तसंच डीआरडीओ या संस्थातील शास्त्रज्ञ तसंच उद्योग क्षेत्रातील सुमारे 100 प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

**<u>बांबूलागवड</u>**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत गेल्या पाच वर्षात सुमारे एक हजार ६११ हेक्टरवर बांबू लागवड करण्यात आली आहे. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा आघाडीवर असून त्याखालोखाल नंदुरबार, रायगड आणि पुणे जिल्हयातील शेतक-यांनी बांबू लागवड करण्याला प्राधान्य दिलं आहे. कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक डॉक्टर कैलाश मोते यांनी आज ही माहिती दिली. पुणे जिल्हयामध्ये ४५ हेक्टरवर बांबूची लागवड केल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>हृदयदिन</u>**

जागतिक हृदय दिनानिमित्त निरोगी हृदय संकल्पना याविषयी हृदयस्पर्श संस्थेच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी पुण्यातील विविध भागात जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. संस्थेचे विश्वस्थ डॉक्टर सुधीर भाटे यांनी ही माहिती दिली.

**<u>अभिजितकुंटे</u>**

भारतीय महिला संघाने बुडापेस्ट इथं नुकत्याच झालेल्या बुद्धिबळ ऑलिंपिक स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं. या संघाचे मार्गदर्शक असणारे पुण्याचे ग्रँडमस्टर अभिजित कुंटे यांचं आज विमानतळावर जल्लोषात स्वागत करण्यात आलं. यावेळी अनेक आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू उपस्थित होते. भारतीय पुरुष आणि महिला संघांनी ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकून जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात भारताचं वर्चस्व सिद्ध केलं आहे, अशी भावना अभिजित कुंटे यांनी यावेळी व्यक्त केली.

**क्रीडा**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने पीडीएफए आंतरशालेय फुटबॉल स्पर्धा सुरू आहेत. यात सेंट विन्सेंट संघाने १२, १४ आणि १६ वर्षाखालील गटात ह्यूम मॅकहेन्री स्कूलविरुद्ध चमकदार विजय नोंदवत आगेकुच कायम राखली. विबग्योर संघ अनुपस्थित राहिल्याने विद्या भवन हायस्कूलला पुढे चाल देण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे  शहरातील अनेक रस्ते जलमय झाले आहेत. उद्या पुणे आणि आसपासच्या भागात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह अति मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**